एम.एड., एम.फील व पी.एच.डी. धारक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे लाभ व सुविधा देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वेतन १२१८/प्र.क्र.४७/टीएनटी-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८

**वाचा :**

१) **शासनाचे पत्र क्र.बैठक २०१८/(प्र.क्र. ३९/१८)/ टीएनटी-२, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८**
२) **संचालक, शिक्षण यंचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उच्च माध्य- २४२/एमफील/ २०१६/४९८५, दिनांक ६ सप्टेंबर, २०१६.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या प्रतिनिधींची शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे समवेत दि. २२/२/२०१६ रोजी मुंबई येथे झालेल्या सभेमध्ये एम.एड., एम.फील व पी.एच.डी. साठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे लाभ व सुविधा द्याव्यात अशी मागणी केली होती. त्याअनुषंगाने मा. मंत्री (शा. शि. व क्रि. विभाग ) यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. ३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने एम.एड., एम.फील व पी.एच.डी. धारक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना विविध चर्चा सत्रामध्ये संशोधन अहवाल वाचण्यासाठी/उपस्थितीसाठी वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे कार्यरजा (Duty Leave) देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

एम.एड., एम.फील व पी.एच.डी. धारक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना विविध चर्चा सत्रामध्ये संशोधन अहवाल वाचण्यासाठी /उपस्थितीसाठी संबंधित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने कार्यमुक्त केल्यास सदर प्रयोजनासाठी त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२८१८१७३८४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.02.28 18:17:53 +05'30'

**( चारुशीला चौधरी )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई
३) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) महालेखापाल, ( लेखा परीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
६) महालेखापाल, ( लेखा अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी
८) आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे
९) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
११) सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक ( माध्यमिक / प्राथमिक )
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३) सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक)
१४) निवड नस्ती-टिएनटी-३.